ZPGADC-27021/175/2025-SOC.WEL.

**दिव्यांग व्यक्ती (समान संधी ) हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग १९९५ सुधारित अधिनियम २०१६ अंतर्गत महाराष्ट्र शासन राजपत्र दिव्यांग कल्याण विभाग दि.०५ सप्टेंबर २०२४ अन्वये जिल्हास्तरीय दिव्यांग कल्याण समिती/नॅशनल ट्रस्ट समिती सभा दिनांक ०६/०८/२०२५ चे इतिवृत्त.**

........................................................................................................

दिव्यांग व्यक्ती (समान संधी हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग ) अधिनियम २०१६ अंतर्गत दि. ०६/०८/२०२५ रोजी सकाळी १२.३० वाजता जिल्हास्तरीय दिव्यांग कल्याण समिती/नॅशनल ट्रस्ट समितीची आढावा सभा मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली.सभेला खालील कर्मचारी/अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १ | मा.श्री.अविश्यांत पंडा,जिल्हाधिकारी गडचिरोली | अध्यक्ष |
| २. | मा.सुहास गाडे,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,गडचिरोली | सदस्य. |
| ३. | मा.श्री.रणजित यादव, प्रकल्प अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,गडचिरोली | सदस्य |
| ४ | मा.श्री.राजेंद्र भुयार, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,गडचिरोली | सदस्य |
| ५ | मा.श्रीमती डॉ.माधुरी किलनाके जिल्हा शल्यचीकीत्सक | सदस्य |
| ६ | मा.श्री.डॉ.प्रताप शिंदे,जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.गडचिरोली | सदस्य |
| ७. | मा.डॉ.सचिन मडावी,सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण विभाग गडचिरोली | सदस्य |
| ८ | मा.श्री.पकंज भोयर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)जिल्हा परिषद,गडचिरोली | सदस्य |
| ९ | मा.योगेंद्र शेंडे,सहाय्यक आयुक्त,जिल्हा कौशल्य विकास,गडचिरोली | सदस्य |
| १० | मा.वासुदेव भुसे,शिक्षणाधिकारी(माध्यमिक) | सदस्य |
| ११. | मा.धनंजय चापले,वरिष्ठ अधिष्ठाता,DIET गडचिरोली | सदस्य |
| १२. | मा.डॉ.हर्षल पाचपोर (प्रतिनधी) अधिष्ठाता वैद्यकीय महाविद्यालय,गडचिरोली | सदस्य |
| १३. | मा.हेमंत मोहुरे नायब तहसीलदार,जिल्हाधिकारी कार्यालय,गडचिरोली | सदस्य |
| १४ | डॉ.प्रशांत खोब्रागडे(PT)DEIC व्यवस्थापक | सदस्य |
| १५ | श्री.सचिन सेलोटे जिल्हा व्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य वित्त व विकास महामंडळ जिल्हा गडचिरोली (प्रतिनिधी) | सदस्य |
| १६ | श्री.अभिजित राऊत,व्यवस्थापक जिल्हा दिव्यांग पुर्नवसन केंद्र,गडचिरोली | सदस्य |
| १७ | श्री.चेतन हिवंज,जिल्हा समाज कल्याण अधिकारी,जि.प.गडचिरोली | सदस्य सचिव |

सर्व प्रथम सदस्य सचिव तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी,जिल्हा परिषद,गडचिरोली यांनी सभेला उपस्थित सर्व सन्माननीय अध्यक्ष/सदस्य/अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करुण मा.अध्यक्ष महोदयांचे परवानगीने सभेच्या कामकाजाची सुरुवात केली.

**१) मागील सभा दि. २४/०४/२०२५ रोजी घेण्यात आली.सदर सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**२)गडचिरोली जिल्हासाठी १०० दिवसांचा कृती आराखडा मध्ये निश्चित केलेले १००० UDID कार्ड जनरेट करणे.**

अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी,गडचिरोली यांनी शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे गडचिरोली जिल्ह्याला १००० UDID कार्ड जनरेट करायचे उदिष्ट निश्चित केले होते.त्यानुसार जिल्हा शल्य चिकित्सक,गडचिरोली यांनी १००० UDID कार्ड जनरेट करून उदिष्ट पूर्ण केले आहे.

**३) महाराष्ट्र शासन दिव्यांग कल्याण विभाग यांचे दि.०५ सप्टेंबर २०२४ प्रमाणे जिल्हा दिव्यांग कल्याण समिती मध्ये अशासकीय सदस्याची निवड करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन दिव्यांग कल्याण विभाग यांचे राजपत्र दि.०५ सप्टेंबर २०२४ प्रमाणे गडचिरोली जिल्ह्यामध्ये दिव्यांग कल्याण समिती मध्ये अशासकीय सदस्याची निवड करावयाची आहे असे जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी सांगितले व त्यानुसार समाज कल्याण विभाग,जिल्हा परिषद,गडचिरोली या कार्यालयास

सद्यस्थितीत ८ प्रस्ताव प्राप्त झाल्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी सांगितले असता, मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी,गडचिरोली यांनी शासकीय सदस्यांना दिव्यांग क्षेत्रात चांगले कार्य करणाऱ्या नोंदणी प्राप्त संस्थांचे सुचविलेले नावांस प्राधान्य द्यावे व ज्यांचे प्रस्तावास कुठल्याही नोंदणीकृत संस्थांचे शिफारस पत्र नाही त्यांना पत्र देऊन त्यांना नोंदणीकृत संस्थेने प्राधिकृत केल्याबाबतचे पत्र सादर करण्यास संधी द्यावी असे मा.अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी,गडचिरोली यांनी असे निर्देश दिले.

**४) गडचिरोली जिल्ह्यातील दिव्यांग बांधवाना जिल्हा दिव्यांग पुर्नवसन केंद्राचे कडून जास्तीत जास्त दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ देणेबाबत.**

मा.जिल्हाधिकारी,गडचिरोली यांनी जिल्हा शल्य चिकित्सक व तहसीलदार संजय गांधी निराधार योजना यांचेकडे दिव्यांग (सिकलसेल) SS पॅटर्न यांची यादी उपलब्ध करून देण्याचे आदेश मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांनी दिले व सदर दिव्यांग (सिकलसेल) SS पॅटर्न यांना जास्तीत जास्त प्रमाणात संजय गांधी निराधार योजनेचा लाभ देता येईल अशी कार्यवाही करण्याबाबत तहसिलदार संजय गांधी निराधार यांना मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांनी निर्देश दिले.

**५) जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत १% निधी मध्ये घेण्याच्या योजनाबाबत.**

गडचिरोली जिल्ह्यात जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत १% निधी दिव्यांग योजनाकरिता राखीव असल्याने सदर निधी खर्च करण्यासाठी जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी निधी तीन मुख्य प्रकार (सहाय्य,उपजीविका,पायाभूत) यानुसार खर्च करावयाचा आराखडा तयार करावयाच्या सूचना मा.जिल्हाधिकारी,गडचिरोली तथा अध्यक्ष यांनी सभेमध्ये दिले तसेच जिल्ह्यातील सर्व यंत्रणांनी त्यांना दिव्यांगासाठी आवश्यक असणाऱ्या योजना किंवा आवश्यक सोईसुविधा करिता प्रस्ताव तयार करून जिल्हा समाज कल्याण अधिकारी,जिल्हा परिषद,गडचिरोली यांचेकडे सादर करावा असे निर्देश मा.जिल्हाधिकारी,गडचिरोली तथा अध्यक्ष यांनी सभेमध्ये दिले.तसेच शिक्षण विभाग,जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा शल्यचीकीत्सक,आत्मा,उमेद यांनी त्यांच्या कार्यालयामार्फत दिव्यांगाकरिता १% निधी मधून घेता येवू शकतील अश्या योजनाच्या माहितीचे १४/०८/२०२५ रोजीच्या जिल्हा वार्षिक योजना आढावा सभेमध्ये सादरीकरण करावे. असे निर्देश मा.जिल्हाधिकारी,गडचिरोली तथा अध्यक्ष यांनी सभेमध्ये दिले.

**६) गडचिरोली जिल्ह्यातील,मतीमंद प्रवर्गातील दिव्यांगासाठी स्थानिक स्तरीय समिती (LLC) साठी प्रचार प्रसिद्धी करणेबाबत.**

गडचिरोली जिल्ह्यातील मतीमंद प्रवर्गातील दिव्यांगासाठी कायदेशीर पालकत्व स्वीकारण्याची योजना आहे.सदर योजनेकरिता कार्यालयास फारच कमी अर्ज येत असल्याने सदर योजनेची प्रचार व प्रसिद्धी करणे व शिबीर आयोजित करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देश मा.जिल्हाधिकारी,गडचिरोली तथा अध्यक्ष यांनी सभे मध्ये दिले.

Signed by
Avishyant Panda
Date: 20-08-2025 09:33:28

अध्यक्ष
तथा
जिल्हाधिकारी,गडचिरोली

(signature)
सदस्य सचिव
तथा
जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद,गडचिरोली

पृष्ठा.पत्र क्रमांक/जिपग/दि.क.सभा/इति/ 975 /२०२५
कार्यालय समाज कल्याण विभाग
जिल्हा परिषद,गडचिरोली
दिनांक:- 25/08/२०२५

प्रती,

........................................................................
........................................................................
........................................................................
........................................................................